महाराष्ट्र शासन

क्रमांक : शिकाना-२००३/(६५/०३)/प्राशि-३,
शालेय शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-४०० ०३२,
दिनांक : १७ डिसेंबर, २००३

प्रति,

विभागीय शिक्षण उपसंचालक,
नाशिक / नागपूर.

विषय :- **इयत्ता २ री ते ७ वीच्या प्रत्येकी एका वर्गास कायम विना अनुदान तत्वावर मंजूरी मिळण्याबाबत.**

संदर्भ :- शासन पत्र क्र. व्हीएलएस-१००३/(५४२/२००३)/प्राशि-३, दिनांक ०८.०७.२००३
शासन पत्र क्र. व्हीएलएस-१००३/(५५७/२००३)/प्राशि-३, दिनांक १९.०८.२००३
शासन पत्र क्र. व्हीएलएस-१०९८/(१२७)/प्राशि-३, दिनांक २७.०५.१९९९

संदर्भीय पत्रान्वये खालील संस्थांना त्यांच्या नांवासमोर दर्शविलेल्या शैक्षणिक वर्षात तसेच नमूद ठिकाणी इंग्रजी माध्यमाची प्राथमिक शाळा ( इ. १ लीच्या वर्गास) सुरु करण्यांस कायम विना अनुदान तत्वावर परवानगी देण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | शैक्षणिक वर्ष | ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | श्री. आसमकुमार सराफ मेमोरियल संस्था, तुमसर,जि.भंडारा | २००३-२००४ | तिरोडा, जि.गोंदिया |
| २ | यशकिर्ती एज्युकेशन सोसायटी, ठाणे | २००३-२००४ | सत्यम कॉम्प्लेक्स, नालासोपारा (प.),जि.ठाणे |
| ३ | कॅनरा एज्युकेशन सोसायटी, ठाणे. | २००१-२००२ | मिरारोड, जि.ठाणे. |

२. उपरोक्त संस्थांनी शासनास केलेल्या विनंतीनुसार अ.क्र. १ येथील संस्थेस "जून २००३ पासून इ. २ री ते ५ वी " तसेच अ.क्र. २ व ३ येथील संस्थांना २ री ते ७ वी च्या प्रत्येकी एका वर्गास कायम विना अनुदान तत्वावर , भविष्यात माध्यम बदलता येणार नाही, भविष्यात अनुदानाची मागणी करणार नाही व सदर वर्ग प्रत्यक्षात सुरु असतील या अटीवर तसेच प्रचलित अटी व शर्तीच्या अधीन राहून शासनाची परवानगी देण्यात येत आहे.

३.    याबाबतची आवश्यक ती पुढील कार्यवाही तात्काळ करण्यात यावी. तसेच शासनपत्र क्रमांक व्हीएलएस १००३/(५४२/२००३)/प्राशि-३, दिनांक ०८.०७.२००३ , शासनपत्र क्रमांक व्हीएलएस-१००३/(५५७/२००३)/प्राशि-३, दिनांक १९.०८.२००३ व शासनपत्र क्रमांक व्हीएलएस-१०९८/(१२७)/प्राशि-३, दिनांक २७.०५. १९९९ मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या पूर्ततेच्या अनुषंगाने पडताळणी करुन उक्त संस्था संचलीत प्राथमिक शाळांना जून, २००३ पासून इयत्ता २ री ते ५ वी तसेच २ री ते ७ वी च्या इंग्रजी माध्यमाच्या प्रत्येकी एका वर्गास कायम विना अनुदान तत्वावर परवानगी देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ पूर्ण करावी.

(सु.हे. उमराणीकर)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

१) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, गोंदिया.
३) निवड नस्ती, प्राशि-३.